**अतारांकित प्रश्नोत्तरांची चौसष्ठावी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे महिला प्रसूतिगृह व बाल रुग्णालयाच्या नवीन इमारत उभारणीबाबत

**(१) ३९९२ (०५-०४-२०२०). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे महिला प्रसूतिगृह व बाल रुग्णालयाच्या नवीन इमारत उभारणीसाठीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२६-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे महिला प्रसूतिगृह व बाल रुग्णालयाच्या नवीन इमारत उभारणीचा प्रस्ताव दिनांक १९.१२.२०१७ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई कार्यालयास प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव सन २०१८-१९ च्या पुरवणी प्रकल्प अंमलबजावणी आणि सन २०१९-२० च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये केन्द्र शासनास सादर करण्यात आला होता. तथापि, केंद्र शासनाकडून प्रस्तावास मंजूरी प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हयातील शासकीय रुग्णालयात रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसल्याबाबत

**(२) ४६२१ (२५-०३-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयामध्ये गंभीर रुग्णांना तात्काळ वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी जिल्हयात १०८ क्रमांकाच्या १२ रुग्णवाहिका सेवेत आहेत, मात्र मागील काही दिवसांपासून रुग्णवाहिकेमध्ये ३६ डॉक्टरांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात मात्र १७ डॉक्टरांवरच कारभार सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदरहू मागील काही महिन्यांपासून १०८ रुग्णवाहिकेतील वैद्यकीय सुविधांचे नियोजन नसणे, रुग्णालयात रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसल्याच्या तक्रारी वारंवार येत असून रुग्णालय परिसरात स्वच्छता गृह बंद असल्याने या परिसरात दुर्गंधी पसरत असून सदर परिसरात साफ-सफाई होत नसणे, बेड कमी असल्यामुळे रुग्णांवर जमिनीवर गाद्या टाकून उपचार केले जात असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-०९-२०२१) : (**१) नाही, हे खरे नाही.

(२) आणि (३) हे अंशतः खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, हिंगोली २०० खाटांचे रुग्णालय असून रुग्णालयाचे बांधकाम सुरू असून काही बांधकाम अपुर्ण स्थितीत असल्याने रुग्णसेवा पुरविण्यास अडचणी येत आहेत. सद्यस्थितीत ४ वार्डाचे बांधकाम पुर्ण झाले असून सदर वार्ड बांधकाम विभागाकडून ताब्यात घेऊन त्या ठिकाणी नविन बेड उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. रुग्णालयातील सफाईगारांची पदे रिक्त असल्याने रुग्णालयाची स्वच्छता करण्याकरीता अडचणी येत होत्या परंतू दि. १३.१२.२०१६ पासून संपूर्ण जिल्ह्यामध्ये स्वच्छता सेवा व वस्त्रधुलाई सेवा रोजंदारी पध्दतीने खाजगी संस्थेकडून घेण्यात येत असून सध्या रुग्णालय स्वच्छता नियमितपणे करण्यात येत आहे.तसेच जिल्हा रुग्णालय, हिंगोलीच्या परिसरात उपलब्ध असलेले सुलभ शौचालय रुग्ण कल्याण समितीच्या मंजूरीने ना नफा ना तोटा तत्वावर स्वयंसेवकामार्फत चालविण्यासाठी मान्यता देण्यात आली असून तसे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आत परिसरातील स्वच्छतागृह रुग्ण व नातेवाईकांना वापरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिवणी पिसा येथील सुलतानपूर/अंजनी खुर्द (ता.जि.बुलढाणा) प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत

**(३) ४७१४ (२२-०३-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवणी पिसा येथील सुलतानपूर/अंजनी खुर्द (ता.जि.बुलढाणा) प्राथमिक आरोग्य केंद्राला माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान कुलूप लावण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राथमिक आरोग्य केंद्राला कुलूप लावण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरील आरोग्य केंद्र तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-०९-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अधिकारी/कर्मचा-यांची निवासस्थाने उपलब्ध नसल्याने अधिकारी/कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्यामुळे गावकऱ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राला कुलूप लावले.

(३) सदर प्राथमिक आरोग्य केंद्राला दि.१०.११.२०१९ रोजी सकाळी कुलूप उघडुन सुरू करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद स्तरावरुन मुख्यालयी उपस्थित न राहणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला असून प्रशासकिय कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा वागधरा (गुमगांव) व मौजा वलनी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजूरी मिळण्याबाबत**

**(४) ४७८५ (२२-०३-२०२०). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा वागधरा (गुमगांव) व मौजा वलनी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजूरी मिळण्याबाबत लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पत्रान्वये आरोग्य केंद्राला तातडीने मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-०९-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) मौजा वागधरा (गुमगांव) मौजा वलनी (ता.हिंगणा, जि.नागपूर) ही ठिकाणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या लोकसंख्या आणि अंतराच्या निकषात बसत नसल्यामुळे मंजूरी देता येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आरोग्य सुविधा योजनांच्या माहितीची जनजागृती करण्याबाबत**

**(५) ४९०९ (२२-०३-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लोकांपर्यंत आरोग्य सुविधा पोहचविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर कोटयावधी रुपयांची तरतुद केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात वस्त्यांमधील नागरिक आरोग्य सुविधांबाबत अनभिज्ञ असल्याची माहिती सर्वेक्षणातून माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय विविध योजनांच्या माहितीची जनजागृती करण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची गरज असतानाही त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे अनेक नागरिक शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-०९-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

आरोग्य योजनांबद्दल जनजागृतीसाठी केंद्र शासनामार्फत प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये तसेच राज्य शासनामार्फत अनुदान उपलब्ध केले जाते.

(२) हे अंशत: खरे आहे.

मास, पुणे या संस्थेने केवळ पालघर जिल्ह्यातील राष्ट्रीय सांसर्गिक रोगांबाबत केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल सादर केला आहे व क्षयरोग व मलेरिया या आजाराबाबत अधिक जनजागृतीची आवश्यक असल्याचे सुचविले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

शासनाच्या वतीने प्रत्येक कार्यक्रम निहाय विविध आयईसी उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये मास मिडीया (उदा. रेडिओ,टीव्ही), मिड मिडीया (उदा.फोल्डर,पोस्टर) या घटकांवर भर देण्यात येत आहे. तसेच सोशल मिडीयाचा वापर सुध्दा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुराडा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील प्राथमिक आरोग्य पथकाचे केंद्रात रुपांतर करण्याबाबत**

**(६) ५८६९ (२५-०३-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुराडा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील प्राथमिक आरोग्य पथकाचे रुपांतर प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक १६ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य पथकाचे केंद्रात रुपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-०९-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे पुराडा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील प्राथमिक आरोग्य पथकाचे रुपांतर प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्याबाबत आयुक्तालयाने शासनास दिनांक ०६.०१.२०२० रोजी प्रस्ताव सादर केला व शासनाने निर्णय दिनांक ०३.०९.२०२० नुसार श्रेणीवर्धनास मान्यता दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कांजुरमार्ग पश्चिम परिसरातील रुग्णाला वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्यामुळे झालेला मृत्यू

**(७) ११५४२ (०९-०९-२०२०). श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांजुरमार्ग पश्चिम परिसरात राहणाऱ्या एका रुग्णाला श्वास घ्यायला त्रास होत असल्यामुळे त्याच्या कुटुंबीयांनी त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यासाठी रुग्णवाहिका मिळण्यासाठी १०८ क्रमांकावर फोन करुन विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णवाहिकेची तब्बल पाच तास वाट पाहिल्यानंतरही रुग्णवाहिका आली नसल्यामुळे त्या रुग्णाचा मृत्यू झाल्याचे दिनांक ९ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांच्या कुटुंबीयांना रुग्णवाहिका पाठवण्यास वेळ लागत असल्याचे कोणतेही कारण सांगण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार उक्त प्रकरणातील दोषीवर कारवाई करण्यासह मुंबई सारख्या शहरात रुग्णांना तात्काळ रुग्णवाहिकेची उपलब्धता व्हावी यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०५-०८-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

कांजूर मार्ग (पश्चिम) येथून असा कोणताही कॉल मध्यवर्ती आपत्कालीन कक्ष (१०८) येथे प्राप्त झाला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे (जि.धुळे) तालुक्यातील नगाव ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करणेबाबत

**(८) ११६७१ (०८-०९-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे (जि.धुळे) तालुक्यातील नगाव गृप ग्रामपंचायतीचे विभाजन करुन वडेल, तिसगाव, ढंढाणे, रामनगर या गांवाची मिळून स्वतंत्र ग्रामपंचायतीची निर्मिती करण्यात यावी अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी लोकप्रतिनिधींकडे केली असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०८-०९-२०२१) :** (१) व (२)

धुळे (जि. धुळे) तालुक्यातील नगाव ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करुन वडेल, तिसगाव, ढंढाणे, रामनगर या गावांची मिळून स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव अथवा मागणी केल्याचे माहे मार्च, २०२० वा त्या दरम्यान कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

ग्रामपंचायतीचे विभाजन/एकत्रिकरण/निर्मिती यासाठी शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विभागीय आयुक्त यांचेमार्फत विहीत पध्दतीने प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील दैनिक दिव्य मराठी या वर्तमानपत्रावर व संपादक मंडळावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांबाबत

**(९) १२३३८ (१३-०९-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील दैनिक दिव्य मराठीने २०६ नागरिकांचे मानकरी कोण या मथळ्याखाली बातमी प्रकाशित केल्यामुळे लोक सेवकांची बदनामी केली असा गैरसमज करुन दिव्य मराठीवर गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हे राजशिष्टाचाराला अनुसरुन नाही व या घटनेचा निषेध करत राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी सदर गुन्हे तातडीने मागे घ्यावे यासाठी शासनाकडे दिनांक ३० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने गुन्हे मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१०-०८-२०२१) : (**१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधीसूचना क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य, दि.१४/०३/२०२० रोजीच्या अधीसूचनेनुसार कोविड-१९ च्या संसर्गावर उपाययोजना करण्यासाठी नियमावली महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० प्रसिद्ध केली होती. सदर अधीसूचनेत अनु.क्र.०६ नुसार कोणत्याही व्यक्तिस/संस्था/संघटना कोविड-१९ बाबत कोणत्याही प्रकारच्या अफवा/अनधिकृत माहिती इलेक्ट्रॉनिक किंवा सोशल मिडीयाच्या माध्यमातून पसरविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

कोविड-१९ च्या संसर्गावर उपाययोजना अंतर्गत औरंगाबाद शहरातील सर्व शासकीय यंत्रणा काम सुरळीत पार पाडत असतांना शासकीय यंत्रणेबद्दल बदनामीकारक वृत्त प्रसिद्ध केले प्रकरणी पोलीस स्टेशन, बेगमपुरा, जि. औरंगाबाद येथे गु.र.नं. १७०/२०२० भा.दं.वि. कलम ५००, ५०१, ५०५ (१) (ब), १८८, १७७ सह साथीचे रोग अधिनियम कलम ३ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्या अधिक तपासासाठी सिटी चौक, पोलीस स्टेशन येथे वर्ग

करण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या तपासांती मा. न्यायालयात “क” फायनल अहवाल मंजुरीसाठी प्रलंबित आहे.

(२) व (३)

औरंगाबाद श्रमिक पत्रकार संघ, राहुल मकासरे, जिल्हा कार्याध्यक्ष, ऑल इंडिया पँथर सेना, संजय आवटे, राज्य संपादक, दैनिक दिव्य मराठी, औरंगाबाद एडिटर अँण्ड प्रेस रिपोर्टर असोसिएशन चे अध्यक्ष रतनकुमार साळवे यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद, जिल्हाधिकारी औरंगाबाद, पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर यांना दैनिक दिव्य मराठी यांचे विरुद्ध दाखल गुन्हे मागे घेणेबाबत निवेदन सादर केलेले आहे.

दि.२५/०६/२०२० रोजी दैनिक दिव्य मराठी मध्ये चुकीची बातमी प्रसिद्ध करुन जनमानसात भितीचे वातावरण निर्माण केले प्रकरणी पोलीस स्टेशन सिटीचौक येथे गु.र.नं.३२८/२०२० आपत्ती व्यवस्थापन अधिनियम कलम ५४ प्रमाणे दि.२७/०६/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासांती मा. न्यायालयात “क” फायनल अहवाल मंजुरीसाठी प्रलंबित आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**दौंड (जि. पुणे) तालुक्यातील आरोग्य विभागाच्या प्रलंबित प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत**

**(१०) १३०७५ (११-०८-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरवंड (ता.दौड, जि.पुणे) येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करणे व पाटस येथे ट्रॉमाकेअर सेंटर व आरोग्य केंद्र सुरु करणे असे दोन प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याची मागणी लोकप्रतिनिधी सन २०१८ पासून वारंवार करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे वरवंड येथे विशेष बाब म्हणून ग्रामीण रुग्णालयास मान्यता देण्याचे आश्वासन तत्कालीन मंत्री यांनी माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे हे काय,

(३) असल्यास, वरवंड येथील ग्रामीण रुग्णालयास मान्यता देण्याबाबत व पाटस येथे ट्रॉमाकेअर सेंटर व आरोग्य केंद्र सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२४-०८-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मौजे वरवंड ता. दौंड जि. पुणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याच्या प्रस्तावास मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालयास्तरावरुन सुरु असून पाटस येथे ट्रॉमा केअर सेंटर स्थापन करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) १३३३० (०९-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील आरोग्य विभागामध्ये पदे रिक्त असल्यामुळे कोरोना या संसर्गजन्य आजाराला प्रतिबंध करण्यासाठी अडथळे निर्माण होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदामुळे रुग्णांना उपचार मिळण्यास गैरसोय निर्माण होत असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०८-२०२१) : (**१) व (२) हे खरे नाही.

प्राप्त अहवालानुसार रिक्त असलेल्या पदांचा कार्यभार अन्य कर्मचाऱ्यांकडे सोपवून कामे करून घेण्यात आले आहे. तसेच, राष्ट्रीय आरोग्य अभियान व जिल्हाधिकारी स्तरावर विविध संवर्गाची आरोग्य सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून त्यांच्यामार्फत रुग्णसेवा देण्यात आलेली आहे. त्यामुळे रुग्णांना उपचार मिळण्यास गैरसोय झालेली नाही.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील रिक्त पदांच्या ५० टक्के पदभरतीस मा. मंत्रीमंडळाची मान्यता मिळाली होती. त्यानुसार दि.२८.०२.२०२१ रोजीच्या पदभरती परिक्षेद्वारे विविध संवर्गातील  रिक्त पदे भरण्यात आली असून उर्वरित सर्व रिक्त पदे भरण्याची मान्यता मा. मंत्रीमंडळाकडून मिळाल्याने पदभरतीची  कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(४) कार्यवाही सुरू आहे.

---

### पारोळा व एरंडोल (जि.जळगाव) तालुक्यातील क्रीडा संकुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१२) १३५८६ (१७-०७-२०२०). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा व एरंडोल (जि.जळगाव) तालुक्यांतील क्रिडा संकुलाचे काम कोट्यावधी रुपये खर्च करूनही अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू क्रिडा संकुलाचे काम प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या क्रिडा संकुलाची अपूर्णावस्थेत असलेली कामे तातडीने पूर्ण करून क्रिडा संकुल जिल्ह्यातील होतकरु खेळाडूंना वापरण्यासाठी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (११-०८-२०२१) : (**१) हे खरे नाही.
(२) व (३) तालुका क्रीडा संकुल, पारोळा व एरंडोल (जि. जळगाव) मध्ये उपलब्ध करावयाच्या क्रीडा सुविधांसाठी निधी मंजुरीबाबत प्रस्ताव राज्य क्रीडा विकास समितीसमोर ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कोरोना रुग्णावर मोफत उपचार करणेबाबत**

**(१३) १४४१९ (१५-०९-२०२०). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतून राज्यातील १००% कोरोनाग्रस्त रुग्णांवर मोफत उपचार करण्याची घोषणा दि.१ मे या महाराष्ट्र दिनी मा.आरोग्य मंत्र्यांनी केली असताना प्रत्यक्षात खासगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या अनेक रुग्णांना रू.१६ लाख पर्यंत देयके येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्यमंत्र्यांनी केलेल्या उक्त घोषणेच्या विरुद्ध जाऊन दि.१५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास कल्याण डोंबिवली महापालिका व त्यानंतर ठाणे महानगरपालिकेने आदेश काढून खासगी रुग्णालयातील दर आकारणी निश्चित केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिरीक्त दराने निश्चित केलेली ही दरपत्रके पाहता एखाद्या मध्यमवर्गीय कुटुंबातील एकापेक्षा जास्त सदस्यांना कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्यास हे दर कसे परवडतील याच विवंचनेत मध्यमवर्गीय पडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त दोन्ही स्थानिक प्राधिकरणांनी काढलेले हे आदेश तातडीने मागे घेऊन आरोग्य मंत्र्यांच्या घोषणेनुसार मोफत कोरोना उपचार होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक २० मे, २०२० रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (०५-०८-२०२१) :** (१) दिनांक २३ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरिकांना लागू करण्यात आली असून सदर योजनेस दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या रुग्णांकडून अधिक बील आकारल्या बाबतच्या तक्रारी राज्य स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्याकडून हाताळण्यात येत आहेत. तर जिल्हा स्तवरावर संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व महानगर पालिका क्षेत्रामध्ये महागनरपालिका, आयुक्त यांच्याकडून हाताळण्यात येत आहेत.
(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.
(६) हे खरे नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील गंगाबाई रुग्णालयात रुग्णांची होणारी गैरसोय**

**(१४) १४५८६ (१४-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयातील गंगाबाई रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे एका महीलेची जमीनीवरच प्रसुती झाल्याची घटना माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात शासकिय वैद्यकिय महाविद्यालय स्थलांतरीत केल्याने या रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होत असून तेथील वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी रुग्णांची हेळसांड करुन त्यांना उपचारासाठी थेट नागपूरला जाण्याचा सल्ला देत असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रसुती करीता रुग्णालयातील कर्मचारी पैशाची मागणी करीत असल्याचा आरोप महिला रुग्णाच्या नातेवाईकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०६-०९-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानवसंस्था (सारथी) या संस्थेत झालेल्या गैरव्यवहार**

**(१५) १५५२५ (१३-११-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजेश पाडवी (शहादा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानवसंस्था (सारथी) या संस्थेत झालेल्या अनियमितता व गैरव्यवहाराबाबत सखोल चौकशी करण्याबाबत अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी नेमलेल्या समितीची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, चौकशी व कारवाईस विलंब होण्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०२-०८-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) करीता "सारथी" या कंपनीच्या सन २०१८-१९ व २०१९-२० या कार्यकाळातील झालेल्या या चौकशी संदर्भात प्राप्त तक्रारीच्याबाबतीत सचिव आपत्ती व्यवस्थापन (मदत व पुनर्वसन) यांनी चौकशी अहवाल शासनास दि. २८/१/२०२० रोजी सादर केला होता तदनंतर या चौकशी अहवालातील नमूद बाबींची सखोल तपासणी करण्यासाठी मंत्रीमंडळाच्या निर्देशानुसार अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली व त्या समितीचा अहवाल दि. १७/८/२०२० रोजी शासनास सादर करण्यात आला. या उच्चस्तरीय चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयामध्ये 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' व 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' लागू करणेबाबत

**(१६) २०३६४ (१९-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्वसामान्य गरीब गरजू नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देण्याच्या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाना मार्फत अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' व 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' या सद्यस्थितीत खाजगी रुग्णालयामध्ये राबविल्या जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गरीब व आर्थिकदृष्ट्या कमकुवत रुग्ण हे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील रुबी हॉल, के.ई.एम., आदित्य बिर्ला मेमोरिअल हॉस्पिटल, जहांगीर हॉस्पिटल अशा नामवंत रुग्णालयांमध्ये उपचारासाठी जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्रातील सर्व धर्मादाय आयुक्त रुग्णालये (सेवाभावी संस्था) या सार्वजनिक न्यासा मार्फत चालविल्या जात असल्याने सर्वसामान्य व गरीब रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा देणे हाच त्यांचा उद्देश असल्याने राज्यातील सर्वसामान्य रुग्ण हे पैश्याअभावी सदर नामांकित धर्मादाय रुग्णालयात मिळण्याऱ्या गंभीर आजारावरील वैद्यकीय उपचारपासून वंचित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील सर्व धर्मादाय व नामांकित खाजगी रुग्णालयांमध्ये 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' व 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' परिणामकारक राबविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनीधी, चिंचवड यांनी अनेकदा लेखी पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करून उत्तम आरोग्य सेवा देण्याच्या दृष्टीने धर्मादाय रुग्णालयांमध्ये सदर योजना त्वरीत लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२६-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सद्यस्थितीत अंगीकृत शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये राबविण्यात येत आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यात एकूण १५ धर्मादाय रुग्णालये अंगीकृत असून या १५ रुग्णालयात योजनेंतर्गत १ एप्रिल, २०२० ते आजतागायत एकूण २५११५ मोफत शस्त्रक्रिया व उपचार झाले आहेत.

(५) हे खरे आहे.

(६) धर्मादाय उपायुक्त, पुणे यांनी दिनांक १८ जून, २०२० च्या आदेशान्वये ग्रँट मेडीकल फौंडेशन संचलीत रुबी हॉल क्लीनीक, जहांगीर हॉस्पीटल, केईएम हॉस्पीटल, साधु वासवानी मिशनचे इनलॅक्स ॲण्ड बुधारानी हॉस्पीटल, राजस्थानी आणि गुजराथी ट्रस्ट संचलीत पूना हॉस्पीटल, किंग एडवर्ड मेमोरीयल ट्रस्ट संचलीत केईएम हॉस्पीटल, पुणे यांना कोविड-१९ महामारी संपेपर्यंत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सुरू ठेवण्याबाबत आदेशीत केले.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक येथील गोदावरी कालव्यांचे क्षेत्रीय उपविभागीय कार्यालय कोपरगावला स्थलांतरीत करणेबाबत

**(१७) २७११२ (२४-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी कालव्यांचे नुतनीकरण काही स्वयंसेवी संस्था, सहकारी साखर कारखाने, शासनाचा पाटबंधारे विभाग व लोकसहभागातून करणे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी कालव्यांच्या नुतनीकरणाचे काम जलदगतीने होण्यासाठी या कामावर नियमितपणे देखभाल करण्याकरिता नाशिक येथील डाव्या व उजव्या कालव्यांचे क्षेत्रीय उपविभागीय कार्यालय कोपरगाव येथे स्थलांतरीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१२-०७-२०२१) :** (१) गोदावरी उजव्या तट कालव्याचे मातीकाम व कालवा सफाईचे काम युवामित्र फाउंडेशन सिन्नर यांचेमार्फत करण्यात येत आहे. तसेच त्याच धर्तीवर गोदावरी डाव्या कालव्याच्या कामाचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.
(२) गोदावरी कालव्यांवरील नुतनीकरणाची उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित उपविभागाचे मुख्यालय क्षेत्रिय स्थळी कोपरगाव व राहाता येथे स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोदावरी (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) नदीवरील मंजूर झालेल्या कोल्हापूर बंधाऱ्याच्या बांधकामास निधी मिळण्याबाबत**

**(१८) २७१४८ (२४-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) नदीवरील कोल्हापूर बंधारा दोन वेळा वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार या बंधाऱ्याचे बांधकाम करण्याकरिता निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१२-०७-२०२१) :** (१) सन २००५, सन २०१७ व सन २०१९ साली पुरामुळे उजवा व डावा तीर क्षतिग्रस्त होऊन नुकसान झाले आहे.
(२) दि.०१.०३.२०२० रोजी अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी मंजूर को.प.बंधा-याच्या उजव्या तीराच्या क्षतिग्रस्त भागाची संयुक्त पाहणी केलेली आहे.
शासन पत्र संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५३/२०/सिंव्य कमे दि.१३.०८.२०२० अन्वये मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना विशेष बाब म्हणून क्षतिग्रस्त भागाचे कायमस्वरुपी उपाययोजना करणेसाठी संकल्पन द्यावे असे शासनाने आदेश दिलेले आहेत. त्यानुषंगाने मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश नाशिक यांचे पत्र जा.क्र.उमप्र/ता-३/१२७१ सन २०२१ दि.२५.०३.२०२१ अन्वये संकल्पनास आवश्यक माहिती मुख्य अभियंता मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,नाशिक यांना सादर केलेली आहे.
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून क्षतिग्रस्त भागाचे कायमस्वरुपी उपाययोजना बाबतचे संकल्पन प्राप्त झालेनंतर सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन सक्षम स्तरावरुन मान्यता घेण्यात येईल. तद्‌नंतर उपलब्ध निधीनुसार दुरुस्तीबाबत कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गोदावरी कालव्यांच्या वितरिका दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) २७१५२ (२४-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी कालव्यांच्या सर्व मुख्य वितरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात गवत व जंगली वनस्पती वाढल्यामुळे पाणी आवर्तन सुरु असतांना सिंचनाच्या वेळी अडचणी निर्माण होऊन पाण्याचा अपव्यय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वितरिकांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार या वितरिकांची दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१२-०७-२०२१) : (**१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

सदर वितरीकांची पाहणी क्षेत्रिय अधिका-यांनी केली आहे. पावसाळा पश्चात देखभाल व दुरुस्ती आराखडयात सदर कामांचा समावेश करुन निधी उपलब्धतेनुसार कामे करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### हवेली (जि.पुणे) तालुक्यातील कुडजे, गोऱ्हे बुद्रुक, डोणजे, आगळंबे खडकवासला धरण परिसर हद्दीमध्ये बेकायदेशीरित्या बांधकामे सुरु असल्याबाबत

**(२०) २७१६९ (२४-०३-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील कुडजे, गोऱ्हे बुद्रुक, डोणजे, आगळंबे, खडकवासला धरण परिसर हद्दीमध्ये बेकायदेशीरित्या डोंगर फोडून तसेच वृक्षतोड करून प्लॉटिंग, रस्ता व व्यावसायिक स्वरूपाची बांधकामे सुरु असल्याबाबतचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभाग हा बांधकाम निषिद्ध क्षेत्रात येत असून त्या ठिकाणी बेकायदेशीररित्या डोंगर फोडून वृक्षतोड करून अनधिकृत आणि बेकायदेशीर प्लॉटिंग, रस्ता, इमारती, हॉटेल, रेस्टॉरंट इ. बांधकामे झालेली असून यापैकी बहुतांश ठिकाणी मलनिःसारण व्यवस्थाही नसल्याचे निदर्शनास आले, आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१२-०७-२०२१) : (**१) हे खरे नाही.

खडकवासला धरणाचे (HFL) महत्तम पुरपातळीचे आत हद्दीमध्ये बेकायदेशीर डोंगर फोडून तसेच वृक्षतोड करून प्लॉटिंग, रस्ता व व्यावसायिक स्वरूपाची बांधकामे सुरू नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील जे पी नाईक ग्रामीण महिला विकासिनी येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत**

**(२१) २७१७० (०६-०५-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील जे पी नाईक ग्रामीण महिला विकासिनी येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मागील दोन ते अडीच वर्षांपासून वेतन दिले नसल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना मागील दोन ते अडीच वर्षांपासून वेतन दिले नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कर्मचाऱ्यांना पगार मिळणेबाबत तसेच त्यांना पगारापासून वंचित ठेवणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२६-०७-२०२१) : (**१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात माथाडी सल्लागार मंडळाची स्थापना करण्याबाबत**

**(२२) २७१८० (०६-०५-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हमाल यांच्या सामाजिक सुरक्षेकरीता कामगार विभागाच्या वतीने हमाल माथाडी कायदा लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात माथाडी कामगार कायदा लागू करण्यात येऊनही गेली दहा वर्षापासून राज्यात हमाल माथाडी सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात हमाल माथाडी सल्लागार मंडळ स्थापनेबाबत हमाल पंचायत व विविध कामगार संघटनांनी वारंवार शासनाकडे विनंती करूनही अद्यापही माथाडी सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी हमाल माथाडी सल्लागार मंडळ स्थापन न झाल्याने मोठ्या प्रमाणावर अधिकाऱ्यांची एकाधिकारशाही झाल्याने हमाल यांना मोठ्या प्रमाणावर अडीअडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन असंघटित कष्टकरी हमाल, घरेलू कामगार, रिक्षाचालक तसेच राज्यातील शासकीय धान्य गोदामात काम करणाऱ्या हमालांना सामाजिक सुरक्षितता कायद्याच्या अंतर्गत संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०६-०७-२०२१) : (**१) महाराष्ट्र राज्यातील विविक्षित नोकऱ्यांमध्ये कामावर ठेवलेल्या, असंरक्षित श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करण्यासाठी व अशा नोकऱ्यांमध्ये त्यांचा पुरेसा पुरवठा व्हावा व त्यांचा यथोचित व पूर्णपणे उपयोग व्हावा यासाठी त्यांचेशी संबंधित असलेल्या बाबींसाठी महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ हा अधिनियम लागू करण्यात आलेला आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शासन राजपत्र क्रमांक युडब्ल्युए-२०१९/ प्र.क्र.२८१/ काम-५, दि.२२.०२.२०२१ अन्वये माथाडी सल्लागार समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

(५) सर्व असंघटित कामगारांसाठी प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना सुरू केलेली असून त्याचा लाभ कोणत्याही असघंटित कामगारास घेणे शक्य आहे.

घरेलू कामगारांसाठी अंत्यविधी सहाय्य, प्रसुतीलाभ या योजनांचा लाभ देण्यात येतो. तसेच कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या काळात महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे दि.३१.०३.२०२१ पर्यंत नोंदणी केलेल्या सर्व घरेलू कामगारांना रुपये १५००/- आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच परिवहन विभागाने दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील ७.२० लक्ष परवानाधारक रिक्षा चालकांना प्रत्येकी रु.१५००/- एकवेळचे अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्राच्या इमारतींचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(२३) २७२२४ (१५-०६-२०२१). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्राच्या इमारतींची दुरावस्था झाली असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत आरोग्य सुविधांची निकड लक्षात घेता सदर आरोग्य केंद्र आणि उपकेंद्राच्या इमारतींचे नुतनीकरण करण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-०९-२०२१) : (**१) व (२) हे अंशत: खरे आहे.
धुळे जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या एकूण चार प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी १) मालापूर ता.शिंदखेडा २) विखरण,ता.शिरपूर ३) बोरकुंड, ता.धुळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या पुर्नबांधणीसाठी सन २०२०-२१ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून रु.१०२४.३० लक्ष निधी प्राप्त असुन सद्यस्थितीत ई-निविदा स्तरावर आहेत.तर उर्वरित प्राथमिक आरोग्य केंद्र शिरसोला, ता.साक्री येथील मुख्य इमारत व निवासस्थान पाडून बांधण्यासाठी सन २०२२-२३ वर्षातील आदिवासी विकास योजना यातुन प्रस्तावित करण्यात येणार आहे. तसेच धुळे जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या ११ उपकेंद्रापैकी ०९ उपकेंद्र पुर्नबांधणीसाठी सन २०२०-२१ मध्ये रु. ६५९.४४ लक्ष निधी मंजूर झाला असून जिल्हा नियोजन समिती धुळे यांच्याकडून सन २०२१-२२ साठीचा मंजूर निधी अद्याप प्राप्त झालेला नाही.याव्यतिरिक्त २२१ उपकेंद्राची रु. १४००.०० लक्ष रक्कमेची दुरुस्तीची कामे राष्ट्रीय आरोग्य अभियानातर्गत आरोग्य वर्धिनी केंद्रासाठी सुरु आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत सात किलो युरेनियमचा साठा जप्त केल्याबाबत

**(२४) २७२८४ (०९-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अणुबॉम्ब तयार करण्यासाठी लागणारे सुमारे २१ कोटी ३० लाख किंमतीचे ७ किलो युरेनियम दहशतवाद विरोधी पथकाने मुंबईतून जप्त केल्याचे दिनांक ५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात अटक केलेल्या दोन व्यक्ती व सदर घातक तस्करी करणाऱ्या त्यांच्या टोळीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०६-०९-२०२१) : (**१) सदर घटना दिनांक १४.२.२०२१ रोजी निदर्शनास आली.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी २ आरोपीविरूध्द दहशतवाद विरोधी पथक, काळाचौकी पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. १४/२०२१ कलम २४ (१) (अ) अटोमिक एनर्जी कायदा, १९६२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालु असतांना नमूद गुन्ह्यात कलम २८६ भा.दं.वि. सह ४ (डी) सह ६ ए(१)(२) सह ६ (बी) सह स्फोटक कायदा, १८८४ सह २ (बी) सह ५ स्फोटक पदार्थ कायदा, १९०८ या कलमांची वाढ करण्यात आली आहे.

गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक ८.५.२०२१ रोजीचे आदेश क्र. ११०११/३१/२०२१/NIA अन्वये नमुद गुन्ह्याचा पुढील तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा (N.I.A.), मुंबई यांना दिनांक १२.५.२०२१ रोजी वर्ग करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत बाहेरील राज्यातील बोटींना मासेमारी करण्यास बंदी आणण्यासाठी मासेमारी प्रतिबंधक विधेयक मंजूर करण्याबाबत**

**(२५) २७४०६ (०९-०६-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रामधील मासळीच्या प्रजननावर आणि तिच्या नैसर्गिक अधिवासावर एलईडी दिव्यांच्या परिणाम होत असल्यामुळे राज्यामध्ये पर्ससीन नेट मासेमारीला १ जानेवारी ते ३१ मे या कालावधीत बंदी घालण्यात आली असताना पर्ससीन नेटधारक प्रतिबंधित एलईडीद्वारे मासेमारी करीत असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असतानाही पर्ससीन नेटधारकांवर मत्स्यव्यवसाय विभागाकडून कोणतीच कारवाई केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग किनारपट्टीमध्ये सुरु असलेल्या एलइडी व पर्ससीन नेट मच्छीमारी विरोधात अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीतर्फे साखळी उपोषण सुरु असताना सदर उपोषणाच्या पाश्वभूमीवर कारवाईसाठी गेलेल्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या गस्ती नौकेला परराज्यातील हायस्पीड ट्रॉलर्सधारकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पालघर जिल्ह्याच्या समुद्र हद्दीतील वसई ते झाई दरम्यानच्या समुद्रामधील १२ नॉटीकल हद्दीत रायगड व रत्नागिरी येथील पर्ससीन नौकाधारक बेकायदेशीररित्या मासेमारी करीत असल्याने तेथील मत्ससपंदा नष्ट होत असुन स्थानिक मच्छिमारांच्या हाती काहीच लागत नसल्यामुळे येथील मच्छीमारांवर उपासमारीची वेळी आली असुन त्याबाबतची तक्रार स्थानिक मच्छिमांरानी दिनांक १८ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास मत्सव्यवसाय विभागास अनेक वेळा करुनही अद्याप शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच गुजरात राज्याच्या सागरी हद्दीत इतर राज्यातील मासेमारांनी मासेमारी केल्यास एक लाख रुपयांचा दंड व त्या दिवशी पकडलेल्या माशांच्या पाचपट दंड आकारण्यात येणारे विधेयक मंजूर करुन कायदा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत मासेमारीस आळा घालण्याच्या दृष्टीने समुद्र किनाऱ्यांवर एलईडीद्वारे मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गुजरात राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत बाहेरील राज्यातील बोटींना मासेमारी करण्यास बंदी आणण्यासाठी मासेमारी प्रतिबंधक विधेयक मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२४-०८-२०२१) : (**१) हे खरे नाही,

शासन अधिसुचना दि.०५/०२/२०१६ अन्वये पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यात आलेले असुन माहे सप्टेंबर ते माहे डिसेंबर या ४ महिन्याच्या कालावधीकरीता राज्याच्या जलधी क्षेत्रात उक्त अधिसूचनेमध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन परवानगी देण्यात आलेली आहे.

तसेच शासन अधिसूचना दि.२७/०४/२०१८ अन्वये राज्याच्या जलधी क्षेत्रात एलईडी मासेमारीस प्रतिबंध करण्यात आलेला आहे. राज्याच्या जलधी क्षेत्रात अनधिकृत पर्ससीन व एलईडी मासेमारी नौका निदर्शनास आल्यास अशा अनधिकृत नौकावर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ मधील तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्यात येत आहे.

उक्त कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मुंबई, रायगड, ठाणे-पालघर येथील तीनही गस्ती नौका एकत्रित करुन अंमलबजावणी पथक तयार केले आहे. सदर पथकाने गोपनीय पध्दतीने दि.६ एप्रिल २०२१ ते दि.९ एप्रिल २०२१ या कालावधीत मुंबई-शहर, मुंबई-उपनगर व रायगड जिल्हात “धडक मोहीम अभियान” राबविले होते. सदर कालावधीत एकुण २३ अनधिकृत नौकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. त्यामध्ये १ एलईडी नौका व ३ पर्ससीन मासेमारी नौकांचा समावेश आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पालघर जिल्ह्याच्या जलधी क्षेत्रात पर्ससीन मासेमारी नौका मासेमारी करतांना आढळलेल्या नाहीत. गस्ती नौकेद्वारे पालघर जिल्ह्याच्या सागरी जलधी क्षेत्रात प्रभावीपणे गस्त घालण्यात येत असून अनधिकृत मासेमारी नौकांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

(४) हे खरे आहे.

(५) अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या विरुध्द कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ मध्ये सुधारणा करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात येत असून त्यांच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीत झालेल्या दुर्घटनांबाबत

**(२६) २७४१६ (१५-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीत मागील सहा महिन्यात लहान-मोठ्या कारखान्यात माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान स्फोट होऊन रासायनिक कचऱ्याला आग लागून अनेक कामगारांचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोटे औद्योगिक परिसरातील घरडा केमिकल्स कारखान्यामध्ये दिनांक २० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास रिॲक्टरचा स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेत चार कामगारांचा मृत्यू होवून इतर अनेक कामगार जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्रीसमर्थ इंजिनिअरिंग केमिकल्स कारखान्यामध्ये दिनांक १८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास रसायनच्या बॅरलला आग लागून ७ कामगारांचा मृत्यू झाल्याचे तसेच एम.आर.फार्मा प्रा.लि. या कंपनीत दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास भिषण स्फोट होऊन दुर्घटना झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने या औद्योगिक वसाहतीमध्ये वारंवार स्फोट होण्याची कारणे काय आहेत, अशा दुर्घटना यापुढे घडू नये यासाठी उपाययोजना करण्याबाबत तसेच या दुघर्टनेतील मृतांच्या कुटूंबियांना व जखमी कामगारांना अर्थसहाय्य करण्यासह सदरहू दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०५-०८-२०२१) :** (१) लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीमधील मे.डेरा पेंन्टस, (लासा सुपरजेनिरीक्स) या कारखान्यातील रासायनिक कचऱ्याला दि.१६.०१.२०२१ रोजी आग लागली होती. सदर आगीत कोणताही कामगार जखमी किंवा मृत झालेला नाही.

तथापि, मागील सहा महिन्यात लोटे-परशुराम औद्योगिक वसाहतीमध्ये पाच कारखान्यात स्फोट व आगीच्या दुर्घटनेमुळे ११ कामगारांचा मृत्यू झाला आहे.

(२) घरडा केमिकल्स लि., लोटे परशुराम औद्योगिक वसाहत, ता. खेड, जि. रत्नागिरी या कारखान्यात दि.२०.०३.२०२१ रोजी ईलेक्ट्रीक शॉर्ट सर्किट होऊन ज्वालाग्राही रसायनांच्या वाफांचा संपर्क होऊन लागलेल्या आगीत ५ कामगारांचा मृत्यू झाला असून कोणताही कामगार जखमी झालेला नाही.

(३) लोटे-परशुराम औद्योगिक वसाहतीमधील श्री. समर्थ इंजिनिअर्स, या कारखान्यात दि.१८.०४.२०२१ रोजी उत्पादन प्रक्रियेदरम्यान स्टॅटीक चार्ज निर्माण होऊन ज्वालाग्राही रसायनाचा स्फोटात ६ कामगारांचा मृत्यू व ४ कामगार जखमी झाले आहेत.

एम.आर.स्पेशॅलिटी केमिकल्स प्रा.लि., या कारखान्यात दि.२८.०४.२०२१ रोजी स्टॅटीक ईलेक्ट्रीसिटीमुळे आग लागली होती. सदर आगीत कोणताही कामगार जखमी किंवा मृत झालेला नाही.

(४) वरील घटनांची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करुन संबंधित कारखान्यांचे भोगवटादार व व्यवस्थापक यांचेविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ अन्वये एकूण ६ खटले मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

लोटे-परशुराम औद्योगिक वसाहतीमध्ये इलेक्ट्रीक शॉर्ट सर्कीट व स्टॅटीक इलेक्ट्रीसिटीमुळे वारंवार स्फोट होत आहेत. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता कारखाना व्यवस्थापक/ कामगार यांच्यासाठी स्टॅटीक ईलेक्ट्रीसिटीविषयी जागृती कार्यक्रम आणि रासायनिक कारखान्यांचे सुरक्षा लेखा परीक्षण करुन घेण्यात येत आहे. तसेच केंद्रीय निरीक्षण प्रणालीअंतर्गत निरीक्षणास पात्र न झालेल्या राज्यातील अतिधोकादायक, धोकादायक आणि रासायनिक प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांचे निरीक्षण तीन महिन्यात करण्यास दि.०९.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये आदेश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त दुर्घटनेतील मृत कामगारांच्या वारसांना कारखाना व्यवस्थापनाने रु. २.८५ कोटी इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील रबाळे एमआयडीसीमधील मे.मॅचवेल डाय कास्टर्स प्रा.लि. कंपनीत बाल कामगाराचा शॉकसर्कीटमुळे मृत्यू झाल्याबाबत**

**(२७) २७४२१ (१३-०७-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील रबाळे एमआयडीसीमधील मे. मॅचवेल डाय कास्टर्स प्रा.लि. कंपनीत दिनांक ९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास एका १३ वर्षीय बाल कामगाराचा शॉक सर्कीटमुळे मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,तसेच चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०६-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

मे. मॅचवेल डाय कास्टर्स प्रा.लि., एम.आय.डी.सी, महापे, नवी मुंबई या कारखान्यात दि.०७.०५.२०२१ रोजी सकाळी ६:३० वा. च्या सुमारास एका १३ वर्षीय कंत्राटी बाल कामगाराचा इलेक्ट्रीक शॉकमुळे मृत्यू झाला आहे.

(२) सदर अपघाताची चौकशी उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, सरकारी कामगार अधिकारी, ठाणे आणि पोलीस उप निरीक्षक, रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्यामार्फत करण्यात आली असून चौकशीत कारखाने अधिनियम, १९४८, महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ आणि विविध कामगार कायद्यांचा भंग आढळून आला.

(३) कारखाने अधिनियम, १९४८ अन्वये कारखान्याचा भोगवटादार व व्यवस्थापका विरुध्द महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अन्वये ठाणे येथील मा. न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

कामगार उप आयुक्त कार्यालय, ठाणे यांचेमार्फत सदर आस्थापनेविरुध्द विविध कामगार कायद्यांतर्गत मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,बेलापूर,नवी मुंबई येथे खटला दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उप निरीक्षक, रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्यामार्फत भा.दं.वि. व बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारखाना व्यवस्थापनामार्फत मृत बाल कामगाराच्या वारसास रु.५.०० लक्ष इतकी आर्थिक मदत देण्यात आली असून कामगार नुकसान भरपाई अधिनियमांतर्गत आयुक्त, नुकसान भरपाई यांचेकडे नुकसान भरपाई मिळण्याबाबत अर्ज करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील दोन लाख अंगणवाडी कर्मचाऱ्यांना गेल्या दोन महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याबाबत**

**(२८) २७४३१ (१५-०६-२०२१). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बाल विकास योजने अतंर्गत राज्यात सुमारे २ लाख अंगणवाडी महिला कर्मचारी काम करीत असून राज्यात कोरोनाचा वाढता प्रादूर्भाव रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बरोबरीने त्याही कार्यरत असताना त्या मागील दोन महिन्यांपासून मानधनाच्या प्रतिक्षेत असून कोरोना संसर्ग रोखण्यासाठी जाहिर केलेल्या टाळेबंदीच्या काळात त्यांना आर्थिक समस्याना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ५३३ पैकी ४२५ प्रकल्प हे ग्रामीण व आदिवासी विभागात कार्यरत असून त्यात गरीब, विधवा, परित्यक्ता महिलांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अंगणवाडी सेविकांना देण्यात आलेल्या मोबाईलचे दोन महिन्यांचा रिचार्जसाठी मिळणारे ४०० रुपयांचे अनुदान देखील माहे सप्टेंबर, २०२० पासून प्राप्त झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोना संसर्गाच्या काळात कार्यरत असलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अदयापही मानधन व माबाईल रिचार्ज अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने मा. मुख्यमंत्री व आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्याकडे यासंदर्भातील मागण्यांचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यानुषंगाने सदर अंगणवाडी महिला कर्मचा-यांचे मागील दोन महिन्यांचे मानधन व माबाईल रिचार्जचे अनुदान तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२४-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत ५५३ प्रकल्प असून त्यापैकी ४४९ प्रकल्प हे ग्रामीण व आदिवासी असून त्यामध्ये गरीब, विधवा, परित्यक्ता महिलांचा समावेश आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील राज्यातील ४४९ ग्रामीण व आदिवासी तसेच १०४ नागरी अशा एकुण ५५३ प्रकल्पामधील कार्यरत अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे माहे जुलै, २०२१ पर्यंतचे मानधन केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीद्वारे अदा करण्यात आले आहे. तसेच मोबाईल रिचार्जसाठी माहे जुलै, २०२१ अखेर पर्यंत अनुदान जिल्हास्तरावर व प्रकल्पांना वितरित करण्यात आले आहे.

---

**ब्राम्हणपाडा (ता.मोखाडा,जि.पालघर) येथील आगीत चार जणांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२९) २७४८० (१७-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्राम्हणपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील एका दुकानास व घराला दिनांक ३० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास भीषण आग लागून त्यात चार जणांचा मृत्यू झाला तर दोनजण गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार या घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२६-०८-२०२१) : (**१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी मोखाडा (जि.पालघर) पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यू रजि.क्र. ०७/२०२१ सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये प्रकरण दाखल असून सदर प्रकरणाची चौकशी सुरू आहे.
(३) सदर घटना नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने शासन धोरणानुसार मदत देय ठरत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील कृषी विभागांमधील रिक्त असलेली पदे भरणेबाबत**

**(३०) २७५०१ (०९-०६-२०२१). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील कृषी विभागामध्ये सुमारे ९१८ पदे मंजूर असून त्यापैकी तब्बल २८३ पदे रिक्त असल्याचे दिनांक ५ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येऊन कृषी विभागाच्या योजनांची गती मंदावली असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बुलढाणा जिल्हयातील कृषी विभागांमधील रिक्त असलेली पदे तातडीने भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२५-०८-२०२१) :**(१) हे खरे आहे.
बुलढाणा जिल्हयात कृषि विभागाची गट-अ ते गट-ड संवर्गाकरिता एकूण ९२१ पदे मंजूर असून सद्यस्थितीत त्यापैकी ६२४ पदे भरलेली व २९७ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचे प्रमाण सुमारे ३२ टक्के आहे.

वरील पदांमध्ये तांत्रिक संवर्गाची (कृषि सेवेतील) ५८१ पदे मंजूर असून त्यापैकी ४८९ पदे भरलेली तर ९३ पदे रिक्त आहेत. तांत्रिक संवर्गातील रिक्त पदांचे प्रमाण १६ टक्के आहे.
(२) हे खरे नाही.
शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी मुख्यत: तांत्रिक संवर्गातील (कृषि सेवेतील) पदे महत्वाची आहेत. तांत्रिक संवर्गातील बहुतांश पदे भरलेली असून रिक्त असणाऱ्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) कृषि विभागातील सरळसेवा कोट्यातील रिक्त होणाऱ्या गट-अ व गट-ब संवर्गामधील पदांसाठी नियमितपणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठवून पदभरती केली जाते. तसेच गट-क व गट-ड संवर्गामधील पदे संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून प्रचलित नियमांनुसार भरण्याची कार्यवाही नियमितपणे करण्यात येते.

वित्त विभाग, शासन निर्णय दि.१६ मे, २०१८ नुसार कृषि विभागातील तांत्रिक संवर्गातील १०० टक्के पदभरतीस मान्यता देण्यात आली होती.

त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र कृषि सेवेतील गट-अ व गट-ब मधील पदांसाठी शिफारस करण्यात आलेल्या ३९९ अधिकाऱ्यांना फेब्रुवारी, २०२० मध्ये पदस्थापना दिलेल्या आहेत. त्यापैकी बुलढाणा जिल्हयात गट-अ संवर्गात १, गट-ब संवर्गात ४ व गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील १० अधिकाऱ्यांना पदस्थापना दिलेली आहे.

तसेच बदलीव्दारे गट-ब संवर्गात ६ पदे व गट-ब (कनिष्ठ) संवर्गात ४ पदे अशी एकूण १० पदे भरण्यात आलेली आहे.

कृषि सेवकांच्या १४१६ पदांच्या पदभरतीमधील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांचेस्तरावर करण्यात आलेली आहे. त्यातील ४४ कृषि सहाय्यकांना बुलढाणा जिल्हयात पदस्थापित केलेले आहे.

कृषि पर्यवेक्षक संवर्गात बुलढाणा जिल्हयात ९२ पदे मंजूर असुन संपूर्ण ९२ पदे भरण्यात आलेली आहेत.

गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागामार्फत सुरू आहे. तांत्रिक संवर्गातील पदे मुख्यत: भरण्यात आलेली आहेत. तसेच सद्यस्थितीत वित्त विभागाच्या दि.४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार नवीन पदभरतीवर निर्बंध असल्याने तुर्तास कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हरळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) गावाच्या माळरानावर लागलेल्या वणव्यात अर्जुना धरणाच्या कालव्यासाठी ठेवलेल्या पाईपाना आग लागल्याबाबत**

**(३१) २७५२० (०९-०६-२०२१). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हरळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) गावाच्या माळरानावर लागलेल्या वणव्यात अर्जुना धरणाच्या कालव्यासाठी ठेवलेल्या पाईपांना आग लागल्यामुळे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वणव्यामध्ये अर्जुना धरणाच्या कालव्यासाठी ठेवलेल्या पाईपांना आग लागल्यामुळे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०८-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) होय, हे खरे आहे. अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्प, रत्नागिरी येथील कालव्याची कामे (खुलाचर पद्धतिने तसेच बंदिस्त नलिका प्रणाली  पद्धतिने (PDN))मे.शिवशक्ती कंस्ट्रक्शन कंपनी, सांगली यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदर कामासाठी विविध व्यासाचे HDPE पाईप कार्यक्षेत्रावर साठा करणेत आले होते. कार्यक्षेत्रावर साठा केलेल्या HDPE पाईपना दि.२६/०४/२०२१ रोजी वणव्यामुळे आग लागल्याने रु. २.०७ कोटीचे संबंधित ठेकेदाराचे नुकसान झालेले आहे.

सदर पाईपची मालकी संबंधित ठेकेदाराची असल्याने  तसेच निविदानूसार पाईप laying चे काम झालेले नसल्यामुळे, यामध्ये शासनाचे नुकसान झालेले नाही. सदर जळीत प्रकरणी राजापूर पोलिस, ठाणे जळीत रजि.नं. ०५/२०२१ अन्वये जळीत प्रकरण दाखल करण्यात आलेले असून सदर प्रकरणाची पोलिसांमार्फ़त चौकशी चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.घारेगांव व मौ.देवगांव (तांडा) (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील शेतकऱ्यांना ठिंबक सिंचनाच्या अनुदानाची रक्कम अदा करण्याबाबत**

**(३२) २७६०९ (०९-०६-२०२१). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण):** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) मौ.घारेगांव व मौ.देवगांव (तांडा) (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील शेतकऱ्यांनी सन २०१९-२० मध्ये स्व.पांडुरंग फुंडकर फळबाग योजनेतंर्गत प्रत्येकी एक हेक्टरवर ठिबक सिंचन करुन त्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज शासनाकडे सादर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांनी अर्ज सादर केल्यानंतर त्यांच्या शेताची प्रत्यक्ष मोका पाहणी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनामार्फत करण्यांत आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मौ.घारेगांव व मौ.देवगांव (तांडा) येथील शेतकऱ्यांना मागील दीड वर्षापासून ठिंबक सिंचन योजनेअंतर्गतचे अनुदान मिळाले नसल्याचे दिनांक ९ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मौजे घारेगांव व मौजे देवगांव (तांडा) येथील शेतकऱ्यांची थकित असलेल्या ठिंबक सिंचनाच्या अनुदानाची रक्कम अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०२-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) अनुदान अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झोला पिंप्री (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथील गोदावरी नदीपात्रातून होत असलेल्या अवैध वाळू उपसाबाबत**

**(३३) २७७८९ (०९-०६-२०२१). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोला पिंप्री (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथील गोदावरी नदीपात्रातून होत असलेल्या अवैध वाळू उपसावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या स्थानिक गुन्हा शाखेच्या पोलीस पथकावर वाळूमाफियांनी हल्ला केला असल्याचे दिनांक ४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी एक जेसीबी व बारा ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळू उपसा सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळूमाफियांनी पोलीसांवर दगडफेक केल्याने काही पोलीस गंभीररित्या जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करून संबंधित वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२७-०८-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पिंपरी झोला गावालगत गोदावरी नदीपात्रात मोठया प्रमाणात वाळुचा अवैध उपसा होत असल्याबाबत स्थानिक गुन्हा शाखेस खबर मिळाली होती. तेथे वाळूचा उपसा करण्यासाठी जेसीबी मशीन व वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टर आणण्यात आले होते. स्था.गु.शा अधिकारी व कर्मचारी वाळुचा अवैधपणे उपसा करणा-यांवर छापा मारण्यासाठी गेले असता अचानक पणे वाळु माफियांनी पोलीसांवर दगडफेक केल्याने काही पोलीस कर्मचारी जखमी झाले.

(४) सदर प्रकरणात वाळू माफियांविरुध्द पो.स्टे. गु.र.नं १४६/२०२१ कलम ३०७, ३५३, ३७९, १४३, १४७, १४८, १४९ सह क्रिमीनल ॲमेन्डमेंट ॲक्ट कलम ३,७ सह ४८(७)(८) म.ज.म.अ १९६६ प्रमाणे दि ०४/०५/२०२१ रोजी गुन्हा दाखल झाला असून सदर गुन्हयात एका आरोपीला दि. ४/०५/२०२१ रोजी अटक केले असून त्याचे कडून गुन्हयात वापरलेले दोन ट्रक्टर व एक जेसीबी जप्त केले आहे. सध्या सदर गुन्ह्यातील इतर फरार आरोपीचा शोध घेण्यात येत असून गुन्हयात वापरलेले इतर वाहन जप्त करणे बाकी असून तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील शेतक-यांना ठिंबक सिंचनाचे अनुदान देण्याबाबत**

**(३४) २८१९४ (०९-०६-२०२१). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री सिंचन योजनेअंतर्गत प्रलंबित असलेले अनुदान देण्याबाबतची मागणी मा.मुख्यमंत्री, कृषी मंत्री, प्रधान सचिव यांना लेखी निवेदनाद्वारे शेतक-यांनी केली असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९-२० या वर्षातील मुख्यमंत्री सिंचन योजनेतंर्गतचे ३० टक्के अनुदान न दिल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील शेतक-यांना तात्काळ ठिंबक सिंचनाचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२५-०८-२०२१) : (**१) मा. मुख्यमंत्री सचिवालय, मा. मंत्री (कृषि) यांचे कार्यालय व कृषि विभागात शेतकऱ्यांचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) सन २०१९-२० या वर्षात यवतमाळ जिल्ह्यात प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत ६७९४ लाभार्थ्यांना रु.११.१७ कोटी निधीचे वाटप करण्यात आले आहे.

कोविड - १९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर उद्‌भलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे सदर योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचनासाठी पूरक अनुदानाच्या रकमेचे वाटप करण्यात आले नाही. निधी उपलब्धतेसाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यात केंद्र शासनामार्फत १० हजार शेतकरी उत्पादक कंपन्या उभारण्याची योजना यशस्वी करण्याबाबत**

**(३५) २८२०४ (०९-०६-२०२१). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये केंद्र शासनामार्फत १० हजार शेतकरी उत्पादक कंपन्या उभारण्याची योजना यशस्वी करण्यासाठी पीक पद्धती, कृषी विद्यापीठ, सेवाभावी संस्था यांच्या विविध कार्यक्रमांची सांगड घालण्याची सूचना मा.कृषी मंत्री यांनी प्रशासनाला केली असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी उपसंस्थांची नेमणूक करण्यात आली असुन एका शेतकरी कंपनीत ३०० शेतकरी उत्पादक असतील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कंपन्यांच्या माध्यमातून राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना कायमस्वरूपी रोजगार व शेतकऱ्यांना पिक पद्धतीनुसार हमीभाव देण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, यानुषंगाने दहा हजार शेतकरी उत्पादक कंपन्या उभारण्याची योजना यशस्वी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२१-०६-२०२१) :** (१) होय, अंशत: हे खरे आहे.

संपूर्ण देशभरात केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या १०,००० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याची योजना प्रभाविपणे राबविण्यासाठी सदर योजना राज्य शासनाच्या समन्वयाने कृषि व सलंग्न विभागांच्या योजनांची सांगड घालून राबवावी अशा सुचना मा. मंत्री (कृषि) यांनी केल्या आहेत. त्यानुषंगाने कैंद्रीय लघु कृषक कृषि व्यापार संघास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमुद केल्यानुसार योजनेच्या अंमलबजावणीकरीता केंद्र शासनाने SFAC, NABARD, NCDC व NAFED या चार कार्यान्वयन यंत्रणाची नेमणुक केली आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांन्वये लाभ घेण्यासाठी एका शेतकरी उत्पादक संस्थेचे डोंगराळ भागासाठी किमान १०० व इतर भागांसाठी किमान ३०० सभासद असावेत.
(३) शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी, कंपनी कायदा १९५६ अंतर्गत झाली असल्याने सदर कंपनीचे स्वतंत्र अस्तित्व आहे. शेतकरी उत्पादक कंपनीच्या व्यवसाय आराखडयानुसार कंपनीतील भागधारक सभासदांना लाभ होणार आहे.
(४) केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या १०,००० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याची योजना राज्यात कृषि विभागाच्या समन्वयाने राबविण्याकरीता दि. २२/०७/२०२० च्या शासन निर्णयान्वये राज्य स्तरावर सचिव (कृषि) यांचे अध्यक्षतेखाली “राज्यस्तरीय सल्लागार समिती” व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली “जिल्हास्तरीय नियंत्रण समिती” स्थापन करण्यात आली आहे. व योजनेत कृषि विभागाच्या समन्वयासाठी दि.२२/१०/२०२० च्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय नियंत्रण समितीचे “सदस्य सचिव” प्रकल्प संचालक आत्मा यांना घोषित केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हाजीमलंग (जि.ठाणे) येथे कुहिवली गावाच्या हद्दीत रसायनांनी भरलेली पिंप (ड्रम्स) आढळून आल्याबाबत**

**(३६) २८३०८ (०९-०६-२०२१). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाजीमलंग (जि.ठाणे) येथे डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या कुहिवली गावाच्या हद्दीत रसायनांनी भरलेली सुमारे १२५ पिंप (ड्रम्स) दिनांक १७ व १८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलिस व प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी चार व्यक्तींना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, सदरहू चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२९-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४)
हिललाईन पोलीस ठाणे, उल्हासनगर, जिल्हा ठाणे येथे गु.र.क्र.९७/२०२१ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ सह भा.दं.वि. कलम २६८, २६९, २७०, २७८,२८४, ३४ प्रमाणे दिनांक २०.०४.२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अद्यापपर्यन्त सदर गुन्ह्यात ८ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**डोंबिवली (जि. ठाणे) पश्चिमेकडील देवाचा पाडा येथील खाडीकिनारी बेकायदेशीररित्या वाळूचा उपसा होत असल्याबाबत**

**(३७) २८३११ (०९-०६-२०२१). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) पश्चिमेकडील देवाचा पाडा येथील खाडीकिनारी भागामध्ये वाळू माफियांनी बेकायदेशीररित्या वाळूचा उपसा सुरु केला असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात संबधित तहलिसदार, तलाठी मंडळ अधिकारी यांचेकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्याअनुषंगाने बेकायदेशीररित्या वाळूचा उपसा करणाऱ्या संबंधित वाळू माफीयांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच त्यांचेकडून किती रक्कमेचा दंड वसूल करण्यात आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२१) : (**१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई-गोवा महामार्गावरील (ता.पनवेल) पळस्पे फाटा व गावालगत अवजड वाहनांची बेकायदा पार्किंग होत असल्याबाबत**

**(३८) २८४१६ (११-०६-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील (ता.पनवेल) पळस्पे फाटा व गावालगत असलेल्या वेअरहाउस आणि कंटेनर यार्डमध्ये येणा-या अवजड वाहनांना पार्कींगची सुविधा नसल्यामुळे सदर वाहने पळस्पे पुलावर उभी करण्यात येत असल्याने स्थानिक ग्रामस्थ व वाहन चालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूकीच्या दृष्टीने महत्वाच्या मुंबई-गोवा हायवेवर नियमबाहय पार्कींग करणा-या अवजड वाहनांमुळे मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होऊन नागरिकांना शारीरिक व मानसिक त्रास व आर्थिक भुर्दंड पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पळस्पे ग्रामपंचायतीने याबाबत या विभागातील कंटेनर यार्ड व संबंधीत वाहतुक पोलिस विभागाला वारंवार निवेदने देवून सुद्धा कोणतीच कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०२-०९-२०२१) : (**१) व (२) मुंबई-गोवा महामार्गावरील (ता.पनवेल) पळस्पे फाटा व गावालगत असलेल्या वेअरहाऊस आणि कंटेनर यार्डमध्ये येणाऱ्या अवजड वाहनांना पार्कींगची सूविधा नसल्यामुळे सदर वाहने पळस्पे पुलावर उभी करण्यात येत होती.

तथापि, संबंधित कंटेनर यार्ड व्यवस्थापनाने एप्रिल, २०२१ पासून स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था केली असून त्यानंतर सदर ठिकाणी वाहतूक कोंडी झालेली नाही.

(३) व (४) याबाबत वाहतूक पोलीस विभागास पळस्पे ग्रामपंचायतीकडून कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

जानेवारी, २०२१ ते ३१ मे, २०२१ पर्यंत महामार्गावर तसेच रोडवर अनधिकृतपणे पार्क केल्या जाणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदा - १९८८ कलम १५(२)(X)RRR/१७७ व कलम १२२/१७७ अन्वये ४८९ केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

मुंबई-गोवा महामार्गावरील वेअर हाऊस व कंटेनर यार्डचे मालक / व्यवस्थापक यांना वेअर हाऊस व कंटेनर यार्डमध्ये येणारी वाहने रस्त्यावर उभी राहिल्यास कंटेनर चालक व मालकाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याबाबतच्या नोटीस पनवेल व नवीन पनवेल वाहतूक शाखेकडून अनुक्रमे दि.१३.०४.२०२१ व दि.१४.०४.२०२१ अन्वये बजावण्यात आल्या आहेत.

नवीन पनवेल व पनवेल वाहतूक शाखेकडून मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूकीस अडथळा करणाऱ्या वाहनचालकांविरूध्द नियमितपणे कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मंजूर करण्याबाबत**

**(३९) २८४८० (१७-०६-२०२१). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील एकूण ३८,६७२ शेतकऱ्यांनी मागील वर्षीच्या खरीप हंगामातील भात, बाजरी, ज्वारी, सोयाबीन, कांदा, नाचणी इत्यादी पिकांसाठी विमा कवच घेऊन त्याकरिता रुपये ४८ लाख ७७ हजार ५१२ इतकी रक्कम विमा कंपन्यांकडे भरणा केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात मागील वर्षी खरीप हंगामाच्या काळात दोन ते तीन वेळा अतिवृष्टी होऊन त्यामध्ये फळबागा, सोयाबीन, कांदा इ. पिकांचे नुकसान झालेले असुन या पिकांचा देखील शेतकऱ्यांनी विमा उतरविला असतांना दुसरा हंगाम आला तरी शेकडो शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी पिक विम्याचा लाभ दिला नसुन एकूण ३८,६७२ शेतकऱ्यांपैकी केवळ १६५ शेतकऱ्यांना फक्त ५ लाख ६ हजार ९१२ इतक्या रक्कमेचा लाभ दिलेला असल्याचे दिनांक २१ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पीक विम्याकरिता केंद्र व राज्य शासनाने सुमारे ७ कोटी रुपये विमा कंपन्यांकडे भरले असतांना तसेच शेतकऱ्यांनी देखील विम्याची तब्बल ४८ लाख रुपये रक्कम वेळीच भरलेली असतांना सातारा जिल्हयातील उर्वरित ३८,५०५ शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मंजुर न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सातारा जिल्हयातील उर्वरित शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मंजूर करण्यासह विलंब करणाऱ्या संबंधित विमा कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

खरीप हंगाम २०२० मध्ये सातारा जिल्हयातील ३८,५७५ शेतकऱ्यांनी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रक्कम रु.०.४९ कोटी विमा हप्ता भरुन ८१४९ हे. क्षेत्र पिका करीता विमा संरक्षित केले आहे.
(२) अंशतः खरे आहे.

खरीप हंगाम २०२० मध्ये सातारा जिल्हयात प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अंमलबजावणी भारती ॲक्सा जनरल इं. कंपनीमार्फत करण्यात आली. योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरीप हंगाम २०२० मध्ये सातारा जिल्हयातील पात्र ५१० शेतकरी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रु. ८.०३ लाख जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार निर्धारित विमा क्षेत्र घटकातील पिकाचे सरासरी उत्पन्न हे उंबरठा उत्पन्नापेक्षा जास्त आल्याने नुकसान भरपाई देय होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सीएससी-एसपीव्ही ई-गर्व्हनन्स इंडिया लिमिटेड या केंद्र शासनाच्या कंपनीच्या नावाने शासकीय निधीचा अपहार होत असल्याबाबत**

**(४०) २८८१४ (१५-०६-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीएससी-एसपीव्ही ई-गर्व्हनन्स इंडिया लिमिटेड या केंद्र शासनाच्या कंपनीला महाराष्ट्रातील आपले सरकार सेवा केंद्र चालविण्याचे काम सन २०१६ मध्ये वा त्या दरम्यान पुढील चार वर्षांच्या कालावधीकरिता देण्यात येवून या कामाकरिता त्यांना चौदाव्या वित्त आयोगातून निधी देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मुदत संपल्यानंतर उक्त कंपनीस मुदतवाढ देताना नवीन करार करून त्यास उच्चाधिकार समितीची व राज्य मंत्रीमंडळाची मान्यता घेणे बंधनकारक असताना अशी कोणतीही मान्यता न घेता नियमांचे उल्लंघन करून उक्त कंपनीस पुढील पाच वर्षांकरिता सन २०२० मध्ये वा त्या दरम्यान मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत चौदावा वित्त आयोग संपुष्टात येवून पंधरावा वित्त आयोग सुरू झालेला असून त्यामध्ये प्रशासकीय खर्चासाठी निधीची कोणतीही तरतूद नसताना राज्यातील आपले सरकार सेवा केंद्र चालविण्यासाठी ग्रामपंचायती व ग्रामसभांची कोणतीही मान्यता न घेता त्यांच्या निधीतून उपरोक्त कंपनीला निधी देण्याबाबत ग्रामविकास विभागाने एक पत्र निर्गमित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कंपनीच्या राज्यातील भागीदार कंपन्यांचे अधिकारी हे स्वत:स केंद्र शासनाच्या कंपनीचे अधिकारी व कर्मचारी असल्याचे भासवित असून राज्यातील ग्रामपंचायतींकडून दरवर्षी वसूल करण्यात येणारा ३०० ते ४०० कोटी रूपयांचा निधी केंद्र शासनाच्या सीएससी कंपनीकडे जमा न करता स्वत:मध्ये वाटून घेत असून या निधीचा केंद्र शासनाच्या सीएससी कंपनीच्या वार्षिक ऑडीटमध्येही समावेश होत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, केंद शासनाच्या सीएससी या कंपनीच्या राज्यातील भागीदार कंपन्या कोण कोणत्या आहेत व या सर्व कंपन्यांच्या वार्षिक लेख्यांची शासनाने तपासणी केली आहे काय, असल्यास त्याचा तपशील काय आहे, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(६) असल्यास,केंद्र शासनाच्या कंपनीस नियमबाह्यरित्या देण्यात आलेली मुदतवाढ रद्द करून या प्रकरणाची चौकशी करून शेकडो कोटी रूपयांचा अपहार करणाऱ्या केंद्र शासनाच्या सीएससी कंपनीच्या राज्यातील भागीदार कंपन्यांवर तसेच सदरहू प्रकरणी नियमबाह्यरित्या परवानगी देणारे व राज्य शासनाच्या नावाने पत्र/परिपत्रक निर्गमित करणारे संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यासह अपहाराची रक्कम संबंधितांकडून व्याजासह वसूल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०८-२०२१) : (**१) होय.

(२) नाही. सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी राज्यातील पंचायत राज विभागांना दि.३/९/२०१९ रोजी अर्ध शासकीय पत्र दिले.सदर पत्रानुसार देशातील ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्र चालविण्यासाठी CSC,e-Governance India Ltd.यांचे सोबत दि.२१/८/२०१९ रोजी MOU केला असून राज्यांमध्ये सदर प्रकल्प राबविण्यासाठी कंपनीसोबत करारनामा करण्यासाठी MOU चे प्रारूप पाठविण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या उपरोक्त पत्र व प्रारूपानुसार यापुढील कालावधीसाठी सुधारित वाढीनुसार CSC, e-Governance India Ltd. यांचे सोबत करारनामा करण्यात आला आहे.

(३) नाही. पंधरावा वित्त आयोग अनुदान वितरणाबाबत ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र: पंविआ-२०२०/प्र.क्र.५९/वित्त-४, दि.२६ जून,२०२० च्या अनुषंगाने आपले सरकार सेवा केंद्र चालविण्यासाठी ग्रामपंचायतींनी कंपनीला निधी देण्याबाबत ग्रामविकास विभागाने पत्र निर्गमित केले आहे.

(४) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(५) सीएससी या कंपनीच्या राज्यात कोणत्याही भागीदार कंपन्या असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सालाई गोधनी (जि.नागपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत**

**(४१) २९०७८ (१५-०६-२०२१). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालाई गोधनी (जि.नागपूर) हे नागपूर शहरापासून अवघ्या १४ कि.मी.अंतरावर असून येथे १० कोटींची प्राथमिक आरोग्य केंद्राची बांधकाम झालेली इमारत, बेड्स, ऑक्सिजन सिलेंडर, औषधी भांडार गृह, शस्त्रक्रिया विभाग, अतिदक्षता कक्ष वापराविना असल्याचे माहे एप्रिल २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संसर्गाच्या काळात शहरातील तथा ग्रामिण भागातील नागरिकांना बेड्स मिळत नाहीत अशा वेळी उक्त प्राथमिक आरोग्य केंद्राचा उपयोग करता आला असता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२४-०८-२०२१) : (**१) आणि (२) नाही, हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र, सालाई गोधनी (जि.नागपूर) हे दि.२३ एप्रिल, २०२१ रोजी कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

(३) आणि (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### धुळे जिल्ह्यात लिसील कंपनीच्या संचालकांनी ठेवीदारांची केलेली फसवणूक

**(४२) २९१३१ (०९-०६-२०२१). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात माऊली, मैत्रेय व इतर कंपन्यांप्रमाणे लिसील नामक कंपनीच्या संचालकांनी ठेवीदारांना आकर्षक बक्षीस व दाम दुपटीचे आमिष दाखवून सामान्य नागरिकांची फसवणूक केल्याचे दिनांक २३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२७-०८-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

गुन्ह्याच्या तपासांत असे दिसून आले की, लिसील कंपनीचे मुख्य डायरेक्टर चंदसिंग शिवाजी उर्फ शिवाजीभाई चौहाण वेसु, सुरत, गुजरात राज्य यांनी यातील इतर आरोपीतांचे सहाय्याने LICIL (Life Innovative Corporation India Ltd ) कंपनी स्थापन करून त्यात कंपनीचे कामकाज वाढविणेसाठी व ठेवीदारांकडून मोठया प्रमाणात रकमा जमा करणेकामी संचालक मंडळातील लोकांनी गुन्ह्याचे कटकारस्थान करुन कंपनी स्थापन केली. परंतु कंपनीचे मुख्य प्रतिनीधी एजंट म्हणून कंपनीचे काम करणारे कंपनीची जाहीरात करणारे यांनी कंपनीची कोणतीही खातरजमा न करता किंवा कंपनीची विश्वासार्हता न पडताळता वेळोवेळी वेगवेगळया ठिकाणी सेमिनार आयोजित करून ठेवीदारांना अतिशय भावूक करून आकर्षक प्रलोभने दाखविली, तसेच ठेवींवर दामदुप्पट करून तथा आकर्षक परतावे देण्याचे वचन देवून नमुद कंपनीत ठेवी ठेवण्यास ठेवीदारांना प्रवृत्त केले. कंपनीचे मुख्य प्रतिनिधी/एजंट यांनी ठेवीदारांच्या ठेवी LICIL कंपनीच्या नावाने स्वीकारून कंपनीचे मुळ मालक अथवा संचालक यांना आर्थिक फायदा करून देवून तसेच ठेवीच्या हप्त्याची रक्कम भरल्यानंतर १) LICIL (Life Innovation Corporation India Pvt Ltd ), २ LDL (licil developers limited), ३)Real Life Creators India Limited, ४) Real Life Agro Cattle Privet Limited या वेगवेगळया कंपनीच्या नावाने जाणीवपुर्वक हप्ते भरणा केल्याच्या पावत्या देवून फिर्यादी व इतर ठेवीदाराची शुध्द फसवणूक करून ठेवींची मुदत संपल्यावरही आजपावतो ठेवींचे पैसे अथवा त्याचा लाभांश परत न करता LICIL कंपनीतील पैसा इतर ३ कंपनीत वळवून फिर्यादीसह धुळे जिल्ह्यातील इतर ठेवीदारांच्या ठेवी स्वीकारून परत केल्या नाहीत.

(३) तक्रारीवरून कंपनीचे संचालक मंडळ एजंट/प्रतिनिधी असे एकूण ११ आरोपींविरूध्द पिंपळनेर, पोलीस ठाणे अपराध क्रमांक ५२/२०२१ भा.दं. वि. कलम ४०९, ४०६, ४२०, १२० (ब), ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थांमधील ) हित संबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व बक्षिस चिठ्ठी आणि धन परिसंचरन योजना (निर्बंध) अधिनियम १९७८ चे कलम ४, ५, ६ प्रमाणे दिनांक २१/०५/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच नमूद गुन्ह्यात मुख्य आरोपी व त्याचा साथीदार आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बासंबा (जि.हिंगोली) येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत**

**(४३) २९१४४ (०९-०६-२०२१). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बासंबा (जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांचे मागील दोन वर्षापासून सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असताना शासनाने अल्प प्रमाणात मदत जाहीर केली, परंतु विमा कंपन्याकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळालेली नसल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिकाचे सरंक्षण म्हणून दरवर्षी मोठ्या प्रमाणात पंतप्रधान पिक विमा योजनेत सहभागी होण्याचे अवाहन कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना केले जाते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील सोयाबीन, कपास, तुर, उडीद, मुग आदि पिकांचा पिक विमा संबंधित कंपनीकडे भरणा करुनही शेतकऱ्यांला दरवर्षी पिक विम्याची रक्कम कंपन्याकडून न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, बासंबा येथील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम देण्यासह पिक विम्याची रक्कम देण्यास विलंब करणाऱ्या संबंधित कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-०८-२०२१) : (**१) हे खरे नाही,

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरीप हंगाम २०१९ मध्ये बासंबा महसुल मंडळातील सोयाबीन पिकाकरीता २५७७ पात्र शेतकऱ्यांना रक्कम रु. २.२२ कोटी नुकसान भरपाई लाभार्थ्याच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.

तसेच खरीप हंगाम २०२० मध्ये बासंबा महसुल मंडळातील सोयाबीन पिकाकरीता १४४२ पात्र शेतकऱ्यांना रक्कम रु. १.४२ कोटी नुकसान भरपाई लाभार्थ्याच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

पंतप्रधान पिक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी आवाहन कृषि विभागाकडून शेतकऱ्यांना केले जाते.

(३) योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार अधिसुचित विमा क्षेत्र घटकातील अधिसुचित पिकांसाठी निर्धारित संख्येप्रमाणे पिक कापणी प्रयोग घेण्यात येतात. सदर पिक कापणी प्रयोगांद्वारे प्राप्त होणाऱ्या पिकांच्या सरासरी उत्पन्नाच्या आकडेवारीची तुलना ही उंबरठा उत्पन्नाशी करुन नुकसान भरपाई निश्चित केली जाते. या योजनेअंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करतांना पैसेवारी, दुष्काळ, टंचाई परिस्थिती आणि पुरामुळे झालेल्या नुकसानी संदर्भात कोणत्याही शासकीय विभाग/संस्थेमार्फत घोषित करण्यात आलेली आकडेवारी ग्राह्य धरण्यात येत नाही.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरीप हंगाम २०१९ मध्ये हिंगोली जिल्हयातील अधिसूचित पिकांकरीता १.६४ लाख पात्र शेतकऱ्यांना रक्कम रु. १२४.५३ कोटी नुकसान भरपाई लाभार्थ्याच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.

तसेच खरीप हंगाम २०२० मध्ये हिंगोली जिल्हयातील अधिसूचित पिकांकरीता १.७५ लाख पात्र शेतकऱ्यांना रक्कम रु. ९९.९३ कोटी नुकसान भरपाई लाभार्थ्याच्या बँक खात्यावर जमा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम देण्याबाबत

**(४४) २९६७९ (१८-०६-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील वर्षी तब्बल १ कोटी २० लाख शेतकऱ्यांनी पीक विम्याचा हप्ता भरलेला असून संबंधित विमा कंपन्यांनी सहा हजार कोटीहून अधिक विम्याची रक्कम वसूल केलेली असुन या वर्षी अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असतानासुद्धा बुलढाणा जिल्हयात सह केवळ १२ लाख ३० शेतकऱ्यांना केवळ ८२३ कोटी रुपयांची भरपाईस पात्र ठरविले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी बुलढाणा जिल्हयातील सर्व तालुक्यांमध्ये ५० पैशाच्या खाली आणेवारी असतांना आणि मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असतानासुद्धा विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिलेली नसुन उक्त विमा कंपन्यांवर कारवाई करून शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ मे २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मलकापुर, नांदुरा तालुक्यातील बऱ्याच बँकांनी शेतकऱ्यांची पीक विम्याची रक्कम अदा न करता त्यांच्या शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा केली असुन कर्ज खात्यात जमा केलेली पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना अदा करणे बाबत तहसीलदार, नांदुरा यांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास नांदुरा तालुक्यातील विविध बँकेच्या शाखा व्यवस्थापकांना पत्र दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणींच्या अनुषंगाने संबंधित विमा कंपन्यावर कारवाई करण्यासह जिल्हयातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम अदा करण्याबाबत तसेच पीक विम्याची रक्कम कर्ज खात्यात जमा न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-०८-२०२१) : (**१) हे अंशत: खरे आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरीप २०२० मध्ये राज्यातील पात्र १५.०१ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. ९७४.११ कोटी निश्चित करण्यात आली असून लार्भार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) जिल्हाधिकारी यांना पिक विम्याची रक्कम मिळणेबाबत निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

योजनेअंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करतांना पैसेवारी, दुष्काळ, टंचाई परिस्थिती आणि पुरामुळे झालेल्या नुकसानी संदर्भात कोणत्याही शासकीय विभाग/संस्थेमार्फत घोषित करण्यात आलेली आकडेवारी ग्राह्य धरण्यात येत नाही.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बुलढाणा जिल्हयातील पात्र २६,२१८ शेतकरी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रु. १७.९१ कोटी जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) तहसीलदार, नांदुरा यांनी विविध बँक शाखांना पत्र दिलेले आहे, हे खरे आहे.

तथापि, प्रधानमंत्री पिक विमा योजनेत, योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनूसार कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत नोंदणी करतांना नोंदविलेल्या बँक खात्यात अनुज्ञेय नुकसान भरपाई विमा कंपनी स्तरावरुन थेट वर्ग करण्यात येते. या संदर्भात पर्यायी बँक खात्यात नुकसान भरपाई वर्ग करण्याची तरतुद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना बनावट व निकृष्ट प्रतीची विद्राव्य खते उत्पादक कंपन्यांनी वाढिव भावाने विक्री केल्याबाबत

**(४५) ३०१५९ (०९-०६-२०२१). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना बनावट व निकृष्ट प्रतीची विद्राव्य खते उत्पादक कंपन्यांनी वाढिव दराने विक्री करुन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने निकृष्ट प्रतीची विद्राव्य खते विकणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-०९-२०२१) : (**१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड येथील गोदावरी या खाजगी रुग्णालयात कोरोना रुग्णाचा मृतदेह तीन दिवसांनी दिल्याबाबत

**(४६) ३०४३५ (१०-०६-२०२१). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील गोदावरी या खाजगी रुग्णालयात धनेगांव येथील शिक्षक अंकलेश किशनराव पवार यांना ताप व खोकला येत असल्याने त्यांच्या पत्नीने ५० हजार रुपये अनामत रक्कम भरुन दाखल केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णाची दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजी स्थिती गंभीर झाल्याने त्याला अतिदक्षता विभागात दाखल केल्यानंतर दिनांक २१ एप्रिल, २०२१ रोजी रुग्णाच्या पत्नीला रुग्णालयातील डॉक्टरांनी रुग्णाला देण्यासाठी ३५ हजार रुपये किंमतीचे टॉनिलिझ्मॅब नावाचे इंजेक्शन आणावयास सांगून रुग्णालयाचे सर्व पैसेही भरण्याची ताकीत दिली, परंतु पत्नीकडे पैसे नसल्याने त्यांनी पैसे भरण्यास काही दिवसाची मुदत मागितल्याने त्यांना दिनांक २४ एप्रिल, २०२१ रोजी पर्यंत मुदत देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुदतीमध्ये पत्नीने ५० हजार रुपये ऑनलाईन आणि ४० हजार रुपये रोखीने रुग्णालय व्यवस्थापकाकडे जमा केल्यानंतर एक तासानी रुग्ण मृत झाल्याचे पत्नीला सांगितले तसेच रुग्णाच्या पत्नीला रुग्णांचा मृतदेह आणि मृत्यु प्रमाणपत्र दिले, त्यामध्ये रुग्ण अंकलेश पवार यांचा मृत्यु दिनांक २१ एप्रिल, २०२१ रोजीच झाला असल्याचे दर्शविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मृत झालेल्या रुग्णाचा मृतदेह पूर्ण पैसे भरल्याशिवाय देण्यात आला नसल्याने याबाबत रुग्णाची पत्नी डॉक्टरांविरुध्द न्यायालयात गेल्याने मा.न्यायालयाने सदर डॉक्टरांविरुध्द फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पोलीसांनी चौकशी करुन डॉक्टरांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे काय, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२७-०८-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रुग्णाची प्रकृती खालावत गेल्यामुळे डॉक्टरांनी रु ३५०००/- किंमतीचे "टॉसीलोझुमॅब" हे इंजेक्शन आणण्यास सांगितले. रुग्णाच्या पत्नी तसेच नातेवाईकाकडे पैसे नसल्याने त्यांना ते भरण्यासाठी हॉस्पीटल कडून मुदत देण्यात आल्याबाबत अधिक तपास चालु आहे.

(३) हे अंशत: खरे आहे. मयताची पत्नी यांनी रु. ५०,००० /- ऑनलाईन जमा केले असून सदर रुग्णालयात ४० हजार रुपये रोखीने जमा केल्याचे सबळ पुरावे अद्याप उपलब्ध नाहीत. मयत व्यक्तीचे मित्र श्री सचिन सुदाम भवरे दिनांक २१/४/२०२१ व दिनांक २२/४/२०२१ रोजी रुग्णास प्रत्यक्षात भेटल्याचे व व्हॉटस ॲप व्दारे रुग्णाची परिस्थिती रुग्णाच्या नातेवाइकाला कळविल्याचे तपासातून समोर आले आहे. रुग्णालय प्रशासनाच्या म्हणण्यानुसार व अभिलेखावरून सदर रुग्णाचा मृत्यु दिनांक २३.०४.२०२१ रोजी झाला आहे. तथापि डॉ. अल्पेवाड यांचे कडून नजर चुकीने रुग्णाचा मृत्यु २१.०४.२०२१ रोजी झाल्याची नोंद करण्यात आली. असे डॉक्टरांनी आपले जबाबात सांगितले.

(४) होय, सदर प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश मा. मुख्य न्यायदंडाधिकारी नांदेड यांच्या न्यायालयातून १५६(३) फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये पारीत करण्यात आले आहे. सदर प्रकरणी पो.स्टे, शिवाजीनगर, नांदेड गु. र. नं. १८४/२०२१ कलम ४२०, ४१८, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा. दं. वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) गोदावरी हॉस्पीटल येथील डॉक्टर व कर्मचारी यांचे विरुध्द पो. स्टे शिवाजीनगर, नांदेड येथे वर नमुद प्रमाणे गु. र. नं. १८४/२०२१ दाखल करण्यात आला असून अधिक तपास चालु आहे. विलंब झालेला नाही.

---

### नागपाडा (मुंबई) येथील बनावट मृत्यूचे दाखले देणाऱ्या रॅकेटबाबत

**(४७) ३०९०३ (१७-०६-२०२१). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपाडा (मुंबई) येथे पोलीस स्थानकाच्या हद्दीत मृतांची तपासणी न करता मृत्यूचे बनावट दाखले देणारे रॅकेट आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, राज्यात इतर ठिकाणीही मृत्यूचे बनावट दाखले देणारे रॅकेट असण्याची शक्यता असल्याने चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०६-०९-२०२१) : (**१) होय.
(२) व (३) या प्रकरणी नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.२७३/२०२१ कलम ४२०, ४६५, ४६६, १९७, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दिनांक १३.०५.२०२१ रोजी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यामध्ये आणखी कोणा व्यक्तीचा सहभाग आहे किंवा कसे याचा सखोल तपास करण्यात येत आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे. तसेच राज्यातील उर्वरीत सर्व जिल्हयांनी या गुन्हयाबाबत तपास केला असता कोणतीही तक्रार अथवा गुन्हा दाखल नसल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाडा (जि.पालघर) तालुक्यातील शेतक-यांची विमा कंपन्यांकडून होत असलेली फसवणूक

**(४८) ३०९३९ (१७-०६-२०२१). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यामध्ये जवळपास दोन हजार हेक्टर भात पिकांचे नुकसान झालेले असताना शेतकऱ्यांनी भात पिकाचा विमा खाजगी कंपनीकडे हेक्टरी एक ते दीड हजार रक्कम भरुन काढला असुन पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अंतर्गत एच.डी.एफ.सी. इग्रो इन्शुरन्स कंपनी लि. कोरेगाव पार्क, पुणे या कंपनीकडे हेक्टरी ९१० रुपयांचा विमा काढलेला असताना विमा कंपनीने सदरहू शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा कंपनीने नुकसान भरपाई दिली असताना गावांमधील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या भरपाईमध्ये मोठी तफावत आढळून आली असल्याने गावागावात शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण होत असताना विमा कंपनी याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ४५,५०० रुपये विमा कंपनीकडून मिळणे आवश्यक असताना फक्त २२०० रुपये रक्कम देऊन विमा कंपनीने शेतक-यांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य पिक विम्याची रक्कम देण्यासह फसवणूक करणाऱ्या संबंधित विमा कंपनी विरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-०८-२०२१) : (**१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत पिकाचे नुकसान झालेल्या प्रमाणात नुकसान भरपाई देय होते. तसेच सरासरी उत्पन्नाची तुलना उंबरठा उत्पादनाशी केल्याने अधिसुचित मंडळांमध्ये नुकसान भरपाईचे प्रमाणातही तफावत राहते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरवडे-पिरंगुट (ता. मुळशी. जि. पुणे) औद्योगिक वसाहतीत रासायनिक कंपनीत भीषण आग लागून कामगारांचा झालेला मृत्यू

**(४९) ३०९९३ (१४-०७-२०२१). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरवडे-पिरंगुट (ता.मुळशी. जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीत (एमआयडीसी) एसव्हीएस ॲक्वा टेक्नोलॉजी या सॅनिटायझर बनवण्याच्या कंपनीत दिनांक ७ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास अचानक आग लागून कंपनीतील ४१ कामगारांपैकी १८ कामगारांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीत पूर्वी पाणी शुद्ध करण्यासाठीच्या जंतूनाशक निर्मिती गोळ्या बनविण्यात येत होत्या व दीड वर्षापासून कोरोना सुरु झाल्यानंतर सॅनिटायझर बनवण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेत १६ महिला कामगार असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारचे अपघात भविष्यात टाळण्याच्या दृष्टीने, कोरोना काळात सॅनिटायझर बनवणाऱ्या कंपन्यांनी अग्निसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपायोजना करण्यात येत आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कंपनीच्या व्यवस्थापनावर कारवाई करुन

मृत पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०६-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

एसव्हीएस ॲक्वा टेक्नोलॉजी, उरवडे-पिरंगुट ता.मुळशी जि.पुणे या कारखान्यात दि.०७.०६.२०२१ रोजी अपघात होऊन १७ कामगारांचा मृत्यू झाला आहे.

(२) होय.

सदर कारखान्यात पाणी शुध्द करण्यासाठीच्या जंतूनाशक गोळयांच्या निर्मितीबरोबरच बाहेरुन सॅनिटायझर आणून ५०० मि.लि. च्या बाटल्यामधून १०० मि.लि. व ५ लिटरच्या बाटल्यामध्ये रिफीलींग केले जात होते.

(३) सदर दुर्घटनेत १७ कामगार आगीमुळे भाजले जाऊन मृत्यू पावले व ४ कामगार जखमी झाले. मृत्यू पावलेल्या १७ कामगारांपैकी १५ कामगार महिला आहेत.

(४) अशा प्रकारच्या व इतर धोकादायक कारखान्यास सुरक्षेबाबत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत सूचना देण्यात आल्या असून रासायनिक, धोकादायक व अतिधोकादायक कारखान्यांचे निरीक्षण प्राधान्याने करण्यास दि.०९.०७.२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये आदेश देण्यात आले आहेत.

(५) सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असून सदर कारखान्याच्या भोगवटादारा विरूध्द कारखाने अधिनियम, १९४८, महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ व महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परिक्षा) नियम, २०१४ च्या नियम भंगाबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांच्या न्यायालयात एकूण ६ खटले दाखल करण्यात आले आहेत.

सदर कारखान्यास कारखाने अधिनियम, १९४८ कलम ४० (२) अन्वये उत्पादन प्रक्रिया बंद करण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहेत.

नुकसान भरपाई :- राज्य कामगार विमा महामंडळ (ESIC) यांचेकडे १७ मृत कामगारांपैकी १२ कामगार नोंदणीकृत असून उर्वरित ५ कामगार राज्य कामगार विमा महामंडळ यांचेकडून नोंदणीसाठी प्रक्रिया सुरू आहे. मृत १२ कामगारांपैकी १० कामगारांच्या वारसास पेंशन सुरू झाले असून इतर कामगारांबाबत प्रक्रिया सुरू आहे. मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई बाबत आयुक्त नुकसान भरपाई यांचे कार्यालयास कळविण्यात आले आहे.

सानुग्रह अनुदान:- राज्य शासनाच्या वतीने मृत कामगारांच्या वारसास प्रत्येकी रुपये ५ लक्ष इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाच्या वतीने प्रत्येकी रुपये २ लक्ष मदत जाहीर केली असून त्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडून पाठपुरावा सुरु आहे.

कारखाना व्यवस्थापनाने मृत कामगारांच्या वारसास प्रत्येकी रुपये १० लक्ष देऊ केले असून रुपये ५ लक्ष इतक्या रकमेचे दोन धनादेश माहे जुलै व डिसेंबर, २०२१ मध्ये अनुज्ञेय आहेत. कारखाना व्यवस्थापनाने मृत कामगारांच्या पाल्याचे पदवीपर्यंतचे शैक्षणिक शुल्क तसेच कारखाना कार्यान्वित झाल्यानंतर मृत कामगारांच्या वारसास नोकरी देण्याचे मान्य केले आहे.

(६) लागू नाही.

---

**देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील डाळींब व आंबा उत्पादक शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत**

**(५०) ३१०५९ (१७-०६-२०२१). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा (जि.नाशिक) तालुक्यात तौक्ते चक्रीवादळामुळे डाळींब व आंबा उत्पादक शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू झालेल्या नुकसानीची पिकविमाअंतर्गत अद्यापही भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून पीकविम्याची रक्कम डाळींब व आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०६-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

माहे मे २०२१ मध्ये तौक्ते चक्री वादळामुळे नाशिक जिल्हातील देवळा तालुक्यामध्ये डाळिंब, आंबा अथवा अन्य फळपिकांचे नुकसान झालेले नसून फक्त भाजीपाला ०.३० हे. क्षेत्र बाधित झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

योजनेअंतर्गत देवळा (जि.नाशिक) तालुक्यासाठी आंबा हे फळपिक अधिसूचीत नाही. त्यामुळे आंबा या फळपिकासाठी विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई देण्यात आली नाही.

डाळिंब या फळपिकासाठी जादा तापमान व गारपीट हे हवामान धोके देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील कोणत्याही महसूल मंडळात लागू झालेले नाही. तसेच जास्त पाऊस व आर्द्रता या हवामान धोक्याचा विमा संरक्षण कालावधी सुरु व्हायचा आहे. या योजनेअंतर्गत विमा संरक्षण कालावधी समाप्त झाल्यानंतर शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.